# जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती बैठक
# दिनांक 22/05/2023 चे इतिवृत्त

मा. श्री पृथ्वीराज बी.पी. भा.प्र.से., जिल्हाधिकारी, लातूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे दिनांक 22 मे, 2023 रोजी दुपारी 2.30 वाजता संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती बैठकीचे इतिवृत.

श्री पी.डी.हणबर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांनी मा. जिल्हाधिकारी, लातूर यांच्या परवानगीने उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत करून बैठकीस सुरुवात केली. मागील बैठकीचे इतिवृत वाचन करुन व नवीन विषयावर खालील प्रमाणे चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | मुद्दा उपस्थित करणा-यांचे नांव | बैठकीमध्ये झालेली चर्चा व ता.अध्यक्षांनी दिलेले निर्देश | संबंधित यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| 1 | औसा तालुक्यातील 4 कोल्ड स्टोरेज अपग्रेडेशन बाबत | श्री येलाले, के.वाय. ॲग्रो एक्सपोर्ट, लातूर | 1. मॅगनेट योजने अंतर्गत प्रस्ताव सादर करणे<br>2. एफ.पी.ओ. तयार करुन स्मार्ट अंतर्गत प्रस्ताव सादर करणे.<br>नाबार्डच्या योजनेमधून कोल्ड स्टोरेजचा प्रस्ताव पाठवण्याबाबत श्री येलाले यांना नाबार्डच्या अधिका-यांनी सांगितले. | श्री येलाले / SAO, लातूर / नाबार्ड |
| 2 | ODOP प्रोडक्ट एक्सपोर्ट करीता राज्य शासनाकडून विशेष योजना असावी, त्यासाठी सुचना कळवाव्यात. | श्री नितीन कलंत्री, दाळ मिल उद्योजक | 1. ट्रेड फेअरचे वार्षिक कॅलेंडर सर्व सदस्यांना देण्यात आले. त्यानुसार इच्छूक सदस्यांनी जास्तीज जास्त सहभाग नोंदवावा असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.<br>2. बोरसुरी दाळ जी.आय. मिळणेबाबत प्रस्तावाचा पाठपुरावा कृषि विभागाने करावा.<br>3. दाळमिल/सोयाबीन उद्योजक / ट्रेडर व्यापारी यांची बैठक घेऊन त्यांना निर्यातीसाठी आवश्यक वाटणा-या सुविधा व अडचणी, मुलभूत सुविधा व निर्यात वाढीसाठी समग्र सूचना लेखी स्वरुपात जिल्हा उद्योग केंद्रास देण्यात याव्यात. एक्सपोर्टचा डाटा देण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचित केले. | DIC / SAO / श्री कलंत्री / श्री बिदादा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | ODOP प्रोडक्ट करीता गोडाऊन / वेअरहाऊस सुविधा / प्रोत्साहन अनुदान बाबत | श्री बिदादा, दाळ मिल उद्योजक | 1. नाबार्डच्या योजने अंतर्गत अॅग्री एक्सपोर्ट इन्फ्रास्टक्चर सुविधासाठी नाबार्ड DDM यांनी इच्छूक उद्योजकांनी अर्ज करण्याबाबत अवाहन केले.<br>2. MCCI फॅसीलीटेशन सेंटर, पुणे यांचे लातूर येथे दोन दिवसाचे निर्यात प्रशिक्षण शिबीर घेण्याबाबत चर्चा झाली. त्यानुसार दाळमिल, सोया व इतर निर्यातदार यांचे जून 2023 मध्ये कमीत कमी 30 उद्योजकांचे शिबीर घेण्यासाठी श्री कलंत्री यांनी पुढाकार घेऊन प्रयत्न करावा, असे मा.अध्यक्षांनी निर्देश दिले. | DDM, नाबार्ड, लातूर<br><br>DIC/ श्री कलंत्री / श्री बिदादा |
| 4 | एक्सपोर्ट अर्थसहाय्य करीता बँक सेवा मिळणेबाबत. | श्री बिदादा, दाळ मिल उद्योजक | 1. लातूर येथे फोरेस सुविधा SBI चंद्र नगर, लातूर येथे उपलब्ध करुन देण्यात आली असल्याचे बँकेच्या अधिका-यांनी सांगितले.<br>2. एक्सपोर्ट कर्जासाठी ODOP उद्योजक / निर्यातदार / दाळमिल उद्योजक यांनी बँकेसोबत बैठक आयोजित करावी. | LDM, लातूर<br>श्री कलंत्री / श्री बिदादा |
| 5 | ऑरगॅनिक फार्मींगबाबत प्रचार / प्रसार होणे, दाळीकरीता बायसेलार मिट आयोजित करणे | श्री बिदादा, दाळ मिल उद्योजक | 1. ऑरगॅनिक फार्मींगसाठी कृषी खात्याने प्रयत्न करावेत. तीन वर्षाचा आराखडा कृषि विभागाने सादर करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचना दिल्या.<br>2. अॅपेडाच्या सुविधा/योजना उपलब्ध करुन देण्याबाबत कृषि विभागाने प्रयत्न करावा.<br>3. केशर अंबा निर्यातीसाठी FPO तयार करावा.<br>4. MPCB व RO MIDC यांनी दाळमिल व सोयाबीन उद्योगातील इंडस्ट्रीयल वेस्ट बाबत माहिती सादर करावी व MPCB यांनी वेस्ट रिसायकलबाबत माहिती देण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचना दिल्या. | SAO, लातूर<br>ADM, लातूर<br>RO MIDC<br>MPCB<br>श्री कलंत्री / श्री बिदादा |
| 6 | दाळ मिल उद्योग व सोयाबीन उद्योग यांची निर्यात विषयक माहिती मिळणेबाबत | SAO लातूर | सोया परिषद दिनांक 14/08/2023 व 15/08/2023 रोजी लातूर येथे नियोजित आहे. तसेच दुस-या दिवशी निर्यात बाबतही तज्ञ मार्गदर्शक व बँकेसोबत चर्चासत्र घेण्यात यावे.<br>1. युनिटवाईज व वर्षवाईज एक्सपोर्टचा डाटा निर्यातदारांनी जिल्हा उद्योग केंद्राकडे संकलित करण्यासाठी सहकार्य करावे. | SAO लातूर / श्री बिदादा / श्री कलंत्री यांनी दाळमिल/ व्यापारी असोसिएशन बैठकीबाबत आयोजन करावे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | ट्रक टर्मिनल सुरु करणेबाबत | श्री बिदादा, दाळ मिल उद्योजक | MIDC अंतर्गत रोड, स्ट्रेट लाईट, ट्रक टर्मिनल बाबत RO MIDC व EE MIDC यांनी माहिती सादर करणेबाबत मा.अध्यक्षांनी सूचित केले. | RO MIDC / EE MIDC |
| 8 | APMC टॅक्स रिफंड मिळावा | श्री बिदादा, दाळ मिल उद्योजक | दाळ / सोया बाबत जो APMC यांना टॅक्स भरावा लागतो त्याचे रिफंड मिळणेसाठी शासनाकडे कळवावे अशी श्री बिदादा मागणी केली. यावर चर्चा होऊन याबाबत दाळ / सोया संघटनेने शासनाकडे निवेदनाद्वारे पाठपुरावा करावा. | दाळ मिल संघटना |
| 9 | निर्यात माल सुविधा केंद्रामध्ये फायटो सॅनेटरी व CFS सर्टीफिकेशन सुविधा उपलब्ध करणेबाबत. | श्री बिदादा, दाळ मिल उद्योजक | निर्यात माल सुविधा केंद्रामध्ये फायटो सॅनेटरी व CFS सर्टीफिकेशन सुविधा उपलब्धबाबत कृषि विभागाने आवश्यक तो प्रस्ताव तयार करुन पुढील कार्यवाही करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचना दिल्या. | SAO, लातूर |
| 10 | ODOP प्रोडक्टसाठी जिल्हयातील शैक्षणिक संस्थेशी मॅपिंग बाबत. | श्री कलंत्री, दाळ मिल उद्योजक | दाळ, सोया व बंजारा गारमेंट हे ODOP प्रोडक्टचे पॅकेजिंग, ब्रॅडींग व मार्केटींग बाबत जिल्हयातील नामांकित शैक्षणिक संस्था व कृषि महाविद्यालये यांचेशी चर्चा करुन MOU करण्यात यावा, यासाठी कृषि विभागाने पुढाकार घ्यावा व यासाठी काय सुविधा लागतील याची माहिती सादर करावी अशा कृषि विभागास मा.अध्यक्षांनी सूचना दिल्या. | SAO, लातूर DIC |

तसेच श्री सुदिप मिटकरी, निर्यात विषयक अधिकारी, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांनी निर्यातबाबत पीपीटी सादरीकरण करुन निर्यात पोर्टलची माहिती दिली.

वरील प्रमाणे कार्यवाही करुन जून 2023 अखेर सर्व यंत्रणांनी अहवाल सादर करावा अशा मा.अध्यक्षांनी सूचना दिल्या. व पुढील बाबतीत नियोजन करुन एक्सपोर्ट वाढीसाठी प्रयत्न करावेत, अशा सर्व यंत्रणांना मा.अध्यक्षांनी सूचना दिल्या.

1. ODOP व एक्सपोर्ट प्रोडक्टसाठी वार्षिक एक्सपोर्ट आराखडा तयार करावा. त्यामध्ये

अ. भौतिक व आर्थिक उद्दिष्ट अंतर्गत मागिल वर्षापेक्षा किमान 10 टक्के एक्सपोर्ट मध्ये वाढ व्हावी.

ब. एक्सपोर्ट प्रोडक्टमध्ये Diversification Product एक्सपोर्ट वाढवावा.

क. कंट्री वाईज सुद्धा एक्सपोर्ट वाढवावा.

इ. एक्सपोर्टरच्या संख्येत वाढ व्हावी.

2. ODOP बायर सेलर मिट बाबत आयोजन कामी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पुढाकार घ्यावा असे सांगितले. दर महिन्याला ODOP किंवा एक्सपोर्ट करिता किमान एकदरी Event/बैठक/ सेमिनार/ वर्कशॉप आयोजित करण्यात यावे.

3. ट्रेड फेअर, कॅलेंडर व शासनाच्या सुविधाबाबतची माहिती जिल्हा उद्योग केंद्र यांनी सादर करावी. विभागीय स्तरावरील EY टीमने एक्सपोर्ट करीता बायर डाटा व हँड होल्डींग सपोर्ट दयावा.

4. राज्य शासनाने एक्स्पोर्ट इन्फ्रास्टंक्चर सुविधासाठी व ODOP एक्सपोर्टसाठी खास योजना तयार करण्यासाठी राज्य शासनास कळवावे, अशी सूचना केली. ODOP व ॲग्री एक्सपोर्टसाठी खाजगी कन्सल्टंशीच्या सुविधा शासनाने घेण्यास एम्पॅनेल करावे अथवा त्यासाठी अनुदान उपलब्ध करुन दयावे.

5. जिल्हा स्तरावर एक्सपोर्ट / ODOP सेलसाठी इस्फ्रास्टक्चर सुविधा, स्टाफ आवश्यक निधी उपलब्ध करुन दयावा, असे शासनास कळविण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचना दिल्या.

6. EPC/DGFT/APADA यांच्या सहकार्याने Awareness Camp आयोजित करण्यात यावा.

7. ODOP बेस्ड क्लस्टर तयार करावे.

शेवटी श्री पी.डी.हणबर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांनी उपस्थितांचे आभार माणून मा.अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र, लातूर

जिल्हाधिकारी
लातूर